# देगलूर महाविद्यालयात जात वैधता प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन

**देगलूर/ प्रतिनिधी**

येथील देगलूर महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) पुणेतर्फे सामाजिक समता पर्वाच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्र मार्गदर्शन आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम.एम.पटेल चमकुडे होते. यावेळी समाज कल्याण विभाग कार्यालय नांदेड येथील अधिकारी बाबु कांबळे व संजय पाटील उपस्थित होते.




प्रास्ताविक नोडल अधिकारी प्रा. डॉ. धनराज लझडे यांनी केले. यावेळी कांबळे बाबू यांनी जात प्रमाणपत्र काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी बाबत मार्गदर्शन केले तर संजय पाटील यांनी कागदपत्राची पुर्तता कसे करावे कुठले कागदपत्र प्रस्तावात जोडली पाहिजेत तसेच येणाऱ्या अडचणी यावर मार्गदर्शन केले. यावेळेस इयत्ता अकरावी, बारावी वर्गातील विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेत आपल्या समस्यांचे निराकरण करुन घेतले. कार्यक्रमास प्रा.सचिन कोंडेकर, वरिष्ठ लिपिक दत्तप्रसन्न साखरे, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

आभार प्रा.एम.एन.कुलकर्णी यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner